
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा॰वा॰
दा.क्र. १२७६



## कांहींतरी नवेंच करा!

BVBK-0401246
BVBK-0401246

# चित्रपट महर्षि

# चित्रपट महर्षि

कांहीं तरी नवेंच करा : ८


वि. वा. हडप

१२४६ दि० २०।५।८१
बा.वा.

BVBK-0401246
BVBK-0401246

पन्नास नये पै

वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.
मुंबई २.



चित्रपट किंवा बोलपटाची सृष्टि हें आजच्या पिढीचें एक अजब आकर्षण आहे. हा व्यवसाय मूळ परदेशांतला. तो सर्वप्रथम भारतांत आणणारे व त्याचा पाया घालण्यासाठीं जीवनभर श्रमणारे दादासाहेब फाळके यांचें चरित्र अनेक दृष्टींनीं अभ्यासिण्यासारखें आहे. चित्रपट म्हणजे स्वैर छचोरपणा असा आज समज होऊन बसला आहे; परंतु दादासाहेब हे जे त्याचे भारतांतले आद्य प्रवर्तक त्यांचा संयम, शिस्त आणि संस्कृति पाहतां हा समज किती चुकीचा आहे हें लक्षांत येईल. एकादी गोष्ट यशस्वी करण्यासाठीं कुटुंबांतील सर्वांनीं मन:पूर्वक सहकार्य करण्याचा आदर्श वस्तुपाठहि त्यांच्या या चरित्रांत पहायला मिळतो.

श्री : १५७ : २ [ ९-६२ ]
::

© १९५९
वोरा ॲण्ड कंपनी,
पब्लिशर्स प्रा. लि.

::
प्रकाशक :
श्र. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि. करितां
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता,
मुंबई २.
::
आवृत्ति दुसरी : १९६२
::
किंमत ५० नये पैसे
::
मुद्रक :
अनंत जे. शाह
लिपिका प्रेस,
कुर्ला रोड, अंधेरी,
मुंबई ५९.

# चित्रपटमहर्षि दादासाहेब फाळके

भारतीय चित्रपट व्यवसायाचें आरंभापासून आजवरचें खरेंखुरें व यथावत् वर्णन आज कदाचित् कुणाला खरें देखील वाटणार नाहीं. कारण हा मुळांतच सोन्याचा चमचा तोंडांत धरून अवनीतलावर अवतरलेला कुबेरशाही व्यवसाय. जगांतील आणि भारतांतील अति संपन्न व्यवसायांत या व्यवसायाची प्रामुख्यानें गणना होते. अनेक चित्रपटसंस्थांचे मालक अथवा दिग्दर्शकच नव्हे तर कलावंत-नट, नटी देखील आपणाला आज असे वैभवशाली दिसतात कीं, त्यांच्या वैभवसंपन्न धनकुबेरी जीवनाकडे पाहतां 'भारतांत दारिद्र्य आहे' असें कोण म्हणेल ?'

**नवें गंगावतरण :**

अशा थोर व संपन्न चित्रपटकलारूपी भागीरथीला भारतांत अवतरविणारा आधुनिक भगीरथ म्हणजे कै. धुंडिराज गोविंद उर्फ दादासाहेब फाळके हे होत. आज आपण भारतांत चित्रपट व्यवसायाचें दाही दिशा ओसंडतें अपार वैभव पाहतों. सातांसमुद्रापलीकडेहि हा भारताचा कीर्ति-दुंदुभि गर्जतांना ऐकतों; परंतु यावरून याच्या आरंभींच्या स्थितीची आपणाला मुळींच कल्पना करतां येणार नाहीं. कारण आज भारतीय चित्रपटसृष्टीचें जें कुबेरवैभव

आपणाला आपल्या देशांत दिसतें, ही सारी मयसभा गेल्या चाळीस-पंचेचाळीस वर्षांत उभी राहिलेली आहे.

महासागराशीं स्पर्धा करणाऱ्या गंगा नदीचें उगमस्थान आपण पाहूं गेलों तर तें देखील असेंच अगदीं सामान्य–डोळ्यांत न भरण्याइतकें सामान्य दिसतें. आणि तिचेंच पुढें भारतमातेला सुजला–सुफला–सस्यश्यामला–वैभवशालिनी म्हणून शोभविणारे विराट वैभव विलसतांना दिसतें, तें पुण्यश्लोक भगीरथाच्या अविश्रांत परिश्रमाचें आणि अजोड कल्पकतेचें फळ होय !

**जन्म-बाल्य-तारुण्य :**

धुंडिराज गोविंद ऊर्फ दादासाहेब फाळके यांचा जन्म प्रतिष्ठित भिक्षुक घराण्यांत श्रीक्षेत्र नासिकशेजारच्या त्रिंबकेश्वरक्षेत्रीं झाला (दि. ३०।४।१८७०). त्यांच्या वडिलांना नोकरीनिमित्त मुंबईंतच रहावें लागे. त्यामुळें त्यांचें बालपण मुंबईंतच गेलें. शिक्षणहि तेथेंच मराठा हायस्कूल, नंतर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्स आणि बडोद्याचें 'कलाभुवन' येथें झालें. मूळपासून दादासाहेबांचा चित्रकला आणि प्रकाशलेखन (फोटोग्राफी) कडे ओढा. अर्थात् ते उद्योगाला लागले तेव्हां त्याच सखलवटीनें प्रवाह वाहूं लागला.

स्वतंत्र उद्योगाला लागण्यापूर्वीं दादासाहेबांनीं, सुंदर चेहऱ्यावर दृष्ट लागूं नये यासाठीं काळें गालबोट रेखाटावें

तशी, थोडे दिवस भारत सरकारच्या पुराणवस्तुखात्यांत नोकरी केली. अर्थात् ती अपवादापुरती.

**नोकरीला रामराम :**

ती नोकरी थोडयाच दिवसांत त्यांनीं सोडून दिली. आणि लोणावळचाला स्वतःचा 'फाईन आर्ट प्रेस' काढला. कोणतीहि गोष्ट हातीं घेतली कीं, ती सर्वांगपरिपूर्ण करण्यासाठीं मनापासून झटायचें हा दादासाहेबांचा जन्मस्वभावच. त्यांनीं लोणावळचाला चित्र-मुद्रणालय काढलें, तेव्हां त्यांना साहजिकच वाटूं लागलें कीं, आपला हा छापखाना चित्रछपाईच्या दृष्टीनें सर्वांगपरिपूर्ण व्हायला हवा. त्यासाठीं यंत्रसामुग्री हवी आणि तीं यंत्रें वापरावीं कशीं याची माहितीहि चांगली हवी.

तेव्हांच त्यांच्या डोक्यांत घोळत होतें—परदेशांतील तिरंगी चित्रछपाई दृष्ट लागण्यासारखी सुंदर होते तशी आपल्या भारतांत कां होऊं नये ?

**युरोपची सफर :**

ती कल्पना मनांत जोपासून दादासाहेब थोडयाच दिवसांनीं जर्मनीला गेले. तेथें चित्रछपाईचीं चांगलीं यंत्रेंहि त्यांनीं ख़रेदी केलीं आणि तिरंगी चित्रछपाईचें ज्ञानहि संपादन केलें. आणि परत भारतांत जे आले तों पहिल्या सपाटचाला आपल्या छापखान्याचा कायापालट त्यांनीं केला, 'लक्ष्मी आर्ट प्रिंटिंग वर्क्स' हा रंगीबेरंगी, सुंदर

चित्रें छापणारा छापखाना मुँबईंत स्वतः त्यांच्या हातानें उभा राहिला.

थोड्याच दिवसांत 'लक्ष्मी आर्ट' चें नांव चित्रछपाई-च्या क्षेत्रांत आदरपूर्वक उच्चारलें जाऊं लागलें. जम चांगला बसला.

**आंधळे ! :**

परंतु नित्य नवी धडपड हा दादासाहेबांचा जन्म-स्वभावच. ऐहिक व्यक्तिगत लोभमोहाच्या बाबतीत नसतील ते हावरे; अल्पसंतुष्ट असतील. परंतु नित्य नवें व अधिकाधिक चांगलें काम करण्याच्या त्यांच्या प्रभावी प्रेरणेला मांडी घालून बसल्यासारखा संतोष कसा तो मुळींच माहीत नव्हता. अशा त्यांच्या धडपड्या प्रयत्नवादी वृत्तीला उजाळा देण्यासाठींच कीं काय छापखाना चाल-वितां चालवितां एकदम त्यांची दृष्टि गेली. पुरे सहा महिने ते जगाला आंधळे आणि जग त्यांना आंधळें ! नंतर मात्र त्यांची दृष्टि परत आली.

**चित्रपटाची स्फूर्ति :**

त्या सहा महिन्यांच्या आंधळ्या अज्ञातवासांतच त्यांना चित्रपट व्यवसायाची कल्पना स्फुरली. अर्थात् त्या स्फूर्तीला चालना मिळायला कारण होतें. त्यांनीं १९१२ सालीं 'खिस्तचरित्र ' (लाईफ ऑफ ख्राईस्ट) हा चित्रपट पाहिला. आणि त्या कलेच्या मर्माचें अमोघ मंगल सामर्थ्य त्यांच्या प्रत्ययास आलें. ते तसेच थोड्या दिवसांत

सिनेमाची यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठीं विलायतेची वाट चालूं लागले. हें साहस आर्थिक दृष्टीनेंहि त्यांच्या स्वतःच्या हिंमतीवर केलेलें होतें. त्यांची आर्थिक स्थिति परदेशाच्या वाऱ्या करण्याइतकी भक्कम नव्हती; पण त्यांची हिंमत भक्कम होती.

विलायतेंत कांहीं महिने—अर्थात् कलात्मक सर्वउघड्या सर्वगामी दृष्टीनें संकल्पित व्यवसायाचा मागोवा घेत—वास्तव्य केलें. नंतर ते विलायतेंतून आवश्यक ती यंत्रसामुग्री व साहित्य घेऊन स्वदेशीं परत आले.

**‘हिंदुस्थान’ चित्रपट संस्थेची स्थापना :**

लगेच थोड्याच दिवसांत त्यांची ‘हिंदुस्थान सिनेमा फिल्म कंपनी’ नासिक येथें स्थापन झाली. त्या संस्थेचा ‘राजा हरिश्चंद्र’ हा पहिला चित्रपट.

राजा हरिश्चंद्र जसा सत्त्वधीरपणापायीं अनंत हाल-अपेष्टांचें जीवन कांहीं काळ तरी जगला, तशीच या ‘राजा हरिश्चंद्र’ चित्रपटाचीहि गत होती. अडचणीच अडचणी; विपुलता अशी तेवढीच. त्यांतली एक अडचण अशी कीं, स्त्रियांच्या भूमिका करण्याजोग्या स्त्रिया मिळण्याची मारामार ! त्याकाळीं नाटक कंपन्यांत देखील स्त्रियांचीं कामें पुरुषांनाच करावी लागत; तसेंच या चित्रपटांत देखील. तरीपण चित्रपट पुरा झाला. १७ मे १९१४ रोजीं मुंबईंत सँढर्स्ट रोडवर आज भव्य पारेख हॉस्पिटल उभें आहे त्या ठिकाणीं असलेल्या ‘कॉरोनेशन सिनेमा-गृहांत’ ‘राजा हरिश्चंद्रा’चें प्रथमदर्शन मुंबईकरांना घडलें.

शितावरून भाताची परीक्षा, तशी वानगीदाखल एकाच गोष्टीवरून देखील दादासाहेबांच्या उद्योगशीलतेची आणि कार्यनिष्ठेची आपल्याला कल्पना करतां येईल. अवश्य ती किमान साधनसामग्री संपादन करून दादासाहेबांनीं हा व्यवसाय सुरू केला, तेव्हां केवळ गल्लाभरू चित्रपटांवर त्यांची नजर खिळून बसली नाहीं. त्यांच्या मनानें घेतलें कीं, आपल्या नव्या पिढीला चांगलें शिक्षण देऊन त्यांना जर भारताचे प्रभावी व सुबुद्ध नागरिक बनवावयाचें, तर त्यांना बालपणापासून चांगल्या सकस शिक्षणाचें वाघिणीचें दूध पाजायला हवें.

**वाटाण्याचा चित्रपट :**

असें चांगलें सकस शिक्षण आपल्या मुलांना द्यायचें तर त्याकामीं शिक्षणार्थी चित्रपटांचा प्रात्यक्षिकांसारखा अमोल उपयोग होतो हा अनुभव तेव्हां नवीन नव्हता. दादासाहेबांच्या मनानें घेतलें, 'बस्स ! आपण शिक्षणार्थी चित्रपट काढायचा.'

त्यासाठीं त्यांनीं 'राजा हरिश्चंद्रा'बरोबरच अशी पहिली निवड केली ती वाटाण्याची. तो चित्रपट घ्यायचा असें ठरलें आणि प्रयोगाला सुरुवात झाली. त्यांची सुरुवात झाली ती वाटाण्याचें बीं रुजत घालण्यापासून. त्यांनीं एका कुंडींत वाटाणा रुजत घातला. त्याला कोंब फुटला. वेल वाढूं लागला. वेल वाढला. त्याला वाटाण्याच्या शेंगा आल्या. इथवर तें रोप रुजल्यासून त्याची कशी कशी वाढ

झाली आणि स्थित्यंतरें झालीं, याची त्यांनीं फिल्म घेतली. ती देखील इतकी खुलासेवार कीं सकाळ, दुपार, संध्याकाळ ते त्या रोपाची बदलती स्थिति अजमावीत आणि तिची फिल्म घेऊन ती चित्रांकित करून ठेवीत. १९१२ ते १९१४ या त्यांच्या धंद्याच्या आरंभकाळांतील ही गोष्ट. 'हरिश्चंद्र' चित्रपटानंतर किंवा अगोदर केव्हां त्यांनीं ही वाटाण्याची फिल्म घेतली कोण जाणे. पण तेव्हांच आगेंमागें; आरंभापासून त्यांची या व्यवसायांतील नजर सर्वस्पर्शी होती एवढें खरें.

**पुन्हा विलायतेची यात्रा :**

याच दरम्यान दादासाहेबांनीं 'भस्मासुर-मोहिनी' आणि 'सावित्री' हे दोन मोठे चित्रपट तयार केले. तसेच, कांहीं शैक्षणिक लघुचित्रपटहि घेतले. हा आपल्या कलेचा आविष्कार समवेत घेऊन ते १९१४ सालीं पुन्हां विलायतेला गेले.

विलायतेंतील मर्मज्ञ कलावंतांनीं आणि उद्योगपतींनीं त्या एकीहून एक सुंदर आणि नाविन्यपूर्ण कलाकृति अवलोकन करून आश्चर्यानें तोंडांत बोटें घातलीं. 'बायोस्कोप' च्या संपादकानें आपल्या अंकांत लिहिलें : "तंत्रदृष्टीनें पाहतां फाळके यांचे चित्रपट पराकाष्ठेचे उत्कृष्ट आहेत." सेसिल हॅपवर्थ स्टुडिओनें तर त्यांना आग्रहानें सांगितलें, "दादासाहेब ! तुम्ही इथेंच विलायतेंत घर करून रहा. इथें आपण भागीदारींत हिंदी चित्रपट काढू. शिवाय आमच्या

स्टुडिओला येऊन मिळाल्याबद्दल आपणाला २५० पौंड मिळतील."

दादासाहेबांनीं ती संधि हंसतमुखानें नाकारली. कारण केवळ भरपूर पैसा मिळवावा, खावें, प्यावें, चैन करावी, इतकी दादासाहेबांची कलानिष्ठ वृत्ति कोती व अप्पलपोटी नव्हती.

**भारतमातेचा सुपुत्र :**

"इतका पैसा खर्चून, इतके कष्ट करून इतक्या लांब हजारों मैल ओलांडून मी आलों तो केवळ पैशाच्या आणि नांवलौकिकाच्या नादीं लागून आलों नाहीं. मी भारतमातेचा पुत्र आहे. माझे श्रम, माझी बुद्धि, माझें ज्ञान, माझें सर्वस्व प्रथम भारतमातेच्या आणि त्याद्वारां सर्वांच्या उद्धारासाठीं वेंचून मला माझा देश वैभवशाली करायचा आहे. मला माझ्या भारतमातेचा सुपुत्र शोभायचें आहे." अशा सुविचारांचें मांगल्य तेव्हां उमलत्या उमेदींत त्यांच्यावर मायेची पांखर धरून पाठीशीं नित्य उभें होतें, म्हणूनच त्यांना तो परदेशी सुखी व संपन्न जीवनाचा मोह टाळतां आला. ते कचासारखी संजीवनी विद्या प्राप्त करून भारतांत परत आले.

दादासाहेबांची 'हिंदुस्थान चित्रपट संस्था' ही एकखांबी द्वारका होती हें तर खरेंच. परंतु अगदीं खरें बोलायचें तर ती त्या कलानिष्ठ जोडप्याची करामत होती असेंच म्हटलें पाहिजे. कारण दादासाहेबांच्या त्या पसाऱ्याचा

भार बरोबरीच्या नात्यानें सौ. काकी–त्यांच्या पत्नी–उत्साहानें आणि खंबीरपणें तोलून धरावयाच्या. तें ज्यांना माहीत आहे तीं माणसें म्हणतात कीं, अशी अर्धांगीची जोड जर दादासाहेबांना नसती, तर त्यांच्या हातून 'हिंदुस्थान'चें एवढें प्रचंड व विलोभनीय कार्य झालें तें मुळींच झालें नसतें.

अशा साहसांत अतिशय अवघड व कठिण काळ आरंभींचाच असतो. कशांत कांहीं नाहीं, अशा प्रयोगावस्थेंत वावरतांना नोकर-चाकर, सहकारी कुठले आणायचें ? आणि सांगोवांगीच्या मोलकरी मेहेनतीनें असे प्रयोग थोडेच सिद्धीला जातात ?

**असा हा व्यवसाय :**

चित्रपट व्यवसाय हें एकटचा माणसाला आवरतां येण्याजोगें कार्य मुळींच नव्हे. फिलम घेण्यासाठीं कॅमेरा चालवणारा कॅमेरामन लागतो. घेतलेली फिलम विस्तृत–स्पष्ट (डेव्हलप) करावी लागते. नंतर ती मुद्रित करावी लागते. स्टुडिओ उभारून त्याची नवी उस्तवारी सतत करावी लागते. असे अनेक संस्कार तिच्यावर व्हावे लागतात तेव्हां चित्रपट तयार होतो आणि आपल्याला तो प्रेक्षागृहांत बसून मौजेनें पहायला मिळतो.

इतक्या साऱ्या गोष्टी आजहि कराव्या लागतात. त्या दादासाहेबांना कराव्या लागतच असत. पण आज करावी लागत नाहीं अशी एक अवघड व किचकट गोष्ट त्यांना

तेव्हां करावी लागे. ती म्हणजे फिलमचें परफोरेटिंग. तेव्हां आरंभीं इकडे ज्या फिलम विकत मिळत, त्या परफोरेट केलेल्या नसत. तें कामहि दादासाहेबांना घरींच करावें लागे.

दुसरें, फिलम घेतांना पुरेसा प्रकाश आवश्यक असतो. हा प्रकाश हवा तेव्हां हवा तसा विजेच्या साह्यानें हुकमी मिळविण्याची अद्यावत् सोय आतां प्रत्येक स्टुडिओंत असते; पण तेव्हां ती नव्हती. तेव्हां प्रकाशाची रचना हवी तशी करून घेण्यासाठीं परिवर्तक (रिफ्लेक्टर) म्हणून पांढरीशुभ्र चादर वापरावी लागे. ती चादर काकींनाच पतीच्या सावलीप्रमाणें शेजारीं राहून धरावी लागे. असा प्रकाश-परिवर्तक त्यांनीं हातांनीं धरायचा आणि त्या प्रकाशांत दादासाहेबांनीं कॅमेरा चालवून फिलम घ्यायची.

मात्र तीं दोघेंच त्या कष्टाचीं आणि यशाचीं सर्वस्वी वांटेकरी होतीं असें नव्हे. त्यांचीं मुलेंहि त्यांत वांटेकरी होतीं. आणि तींहि केवळ वारसा हक्कानें नव्हे, तर खऱ्या-खुऱ्या स्वकष्टांनीं. फाळके घराणें हेंच मुळीं या कलेचें माहेर-घर होतें असें म्हटलें तरी चालेल. दादासाहेबांच्या मुलांनीं त्यांच्या आरंभींच्या चित्रपटांत कामें केलीं, अथवा दादा-साहेबांनीं त्यांच्याकडून कामें करवून घेतलीं, या कामांचा त्या यशांतील वांटा कुणाला कसा नाकारतां येईल ?

### रोहिदासाला बालनट मिळेना :

आणि नाकारतां येण्यासारखी ती सोपी गोष्ट नव्हतीहि. त्यांच्या पहिल्याच चित्रपटांत हरिश्चंद्राची

शोकाकुलतेनें भारावलेली गोष्ट ती. विश्वामित्रानें हरिश्चंद्राची सत्त्वपरीक्षा अतिशय कठोरपणें पाहिलेली. हरिश्चंद्र, राणी तारामती आणि बाळ रोहिदास या तिघांचेंहि जाईजुईच्या फुलांसारखें निव्वळ सौजन्यकोमल जीवन एकीहून एक घोर आपत्तींच्या निखाऱ्यावर होरपळून निघालेलें. त्यांत बाळ रोहिदासाला तर साप चावून मृत्यु येतो !

असला काळजाला घरें पाडणारा भयंकर शोककारक प्रसंग पांच-सात वर्षांच्या एका लहान लेकरानें रोहिदास होऊन वठवायचा होता. कोणत्या आईला आपल्या लेकरावर असा प्रसंग नाटक-सिनेमांत तरी आलेला उघड्या डोळ्यांनीं पाहवेल ?

त्या चित्रपटासाठीं इतर हवा तेवढा संच शोधून मिळाला. हरिश्चंद्र मिळाला. तारामति मिळाली. पण त्यांचा मुलगा रोहिदास होऊन रंगभूमीपुरता-चित्रपटापुरता तरी मरण्यासाठीं आपला मुलगा पुढें करायला कोणीहि आई तयार होईना.

दादासाहेबांनीं सर्व कांहीं प्रयत्न करून पाहिले. हवे तसे माफक वयाचें, सुंदर व हुषार कुमार हेरले. आणि मग त्यांच्या पालकांना विचारलें. थोडा फार पैसा देऊं केला. कीर्तीचें आमिष दाखविलें. तरीहि कोणीहि आई आपला मुलगा सिनेमाच्या पड्यापुरता तरी 'मरूं' द्यायला तयार होईना. अखेर दादासाहेबांनीं आपल्या स्वतःच्या

लहानग्या मुलाला रोहिदास करायचें योजिलें. आणि त्याच्या आईनें—त्या माऊलीनेंहि त्याला होकार दिला.

**शून्यांतून ब्रह्मांड :**

शून्यांतून ब्रह्मांड निर्माण करण्याइतका दादासाहेबांच्या ठायींचा सहृदय कलावंत सदैव जागृत असे. याचें प्रत्यंतर सर्वांना दादासाहेबांच्या त्या क्षेत्रांतील प्रत्येक पावलागणिक येई.

'लंकादहन' हा त्यांचा चित्रपट सन १९१७ सालीं प्रसिद्ध झाला. मारुतीचें उड्डाण हा लंकादहन कथेचा आत्मा. त्या उड्डाणाला तर खरें चित्तवेधक हृदयस्पर्शी महत्त्व. मारुती उड्डाण करून आकाशांत उंच उंच व दूर दूर जातो तेव्हां अगदीं लहान लहान दिसतो. तो देखावा घ्यायचा होता. असले देखावे म्हणजे हातचलाखीचे व नजरचलाखीचे ट्रिकसीन. परंतु किती भव्य व हृदयस्पर्शी !

उदाहरणार्थ 'किंगकाँग' या चित्रपटांतील किंगकाँग आणि त्याच्या राक्षसी पंजांत पिळली जाणारी ती तरुणी यांचा देखावा. किती भयंकर दिसतें तें दृश्य ! पण त्या दृश्याची मौज अशी सांगतात कीं, तशा स्थितींत किंगकाँग (तो नट) आणि ती नटी यांचा प्रत्यक्षांत प्रसंग रुपेरी पडद्यावर दिसतो तसा स्टुडिओंत कधींच आला नव्हता व येत नाहीं.

तसेंच चित्रपटांत हिंस्र जनावरांनीं माणसांना फाडून खाल्ल्याचे देखावे आपण पहातों. अथांग महासागरांतून

माणसें पोहत आहेत, हिंस्र जलचरांशीं त्यांच्या प्राणघातक झटापटी होत आहेत, असे देखावे दिसतात. ही सारी नजरचलाखी व हातचलाखी असते, हें सांगूनहि अनेकांना खरें वाटायचें नाहीं.

**लंकादहन :**

'लंकादहन' चित्रपटांतील मारुतीचें उड्डाण हें अशा हातचलाखीचें व नजरचलाखीचें जबरें उदाहरण आहे. दादासाहेब सन १९१५ सालीं पहिल्या महायुद्धाच्या ऐन रंगांत जर्मनींतून भारतांत आले. युद्धसाहित्याखेरीज इतर सर्व साहित्याच्या टंचाईच्या त्या काळांत 'लंकादहन' नें त्यांनीं पुढें पाऊल टाकलें. या चित्रपटांतील नजरचलाखींत आणि आपण इतर मोठमोठे चित्रपट पाहतों यांतील अशा ट्रिकसीनच्या चलाखींत जमीन-अस्मान इतकें अंतर. हे स्टुडिओ सर्व प्रकारें सुसज्ज बांधलेले. पैसा, कलावंत कारागीर, अद्यावत् यंत्रसाहित्य अशा कशाचीहि वाण तिथें नाहीं. मनांत आणाल तो देखावा म्हणावा तसा हां हां म्हणतां निर्माण करून मयासुराची मयसभा शृंगारून सजवून दाखवितां येते.

परंतु 'हिंदुस्थान चित्रपट कंपनी' चा स्टुडिओ निसर्गसिद्ध व निसर्गनिर्मित. हीं अवाढव्य व अद्‌भुत उपकरणें तिथें कुठचीं असायला ?

बरें, केवळ पैशाच्या अभावीं या गोष्टी त्यांना तेव्हां शक्य नव्हत्या अशांतलीहि गोष्ट नव्हे. पैशांची अडचण

असती, तर ती त्यांनीं हरएक बाबतींत चिकाटीनें व निर्धारानें कांहींहि करून कशीहि दूर केली असती. परंतु ही कला तेव्हां इतकी प्रगत तरी कुठें झाली होती ? भारतांतलें सोडा, पण जर्मनी, इंग्लंड, अमेरिका अशा सर्व प्रकारच्या भौतिक सुधारणांच्या शिखरांवर विराजमान होऊन चमकणाऱ्या देशांतहि आज आपणाला आढळणाऱ्या चित्रपटसृष्टींतील अनेक आश्चर्यकारक सुधारणांचा अरुणोदय देखील तेव्हां झाला नव्हता.

अशा वेळीं दादासाहेबांनीं 'लंकादहन'मधील मारुतीला आकाशांत उंच उंच व दूर दूर उड्डाण करतांना आपणाला दाखविला तो कसा दाखविला असेल ? कल्पना करा.

**'बकाणा' स्टुडिओ :**

फाळक्यांच्या आवारांतच एक मोठा 'बकाणा वृक्ष' होता. हा वृक्ष हाच दादासाहेब फाळक्यांच्या 'हिन्दुस्थान' चित्रपट कंपनीचा अगदी आरंभींचा स्टुडिओ ! या वृक्षाखालीं प्रकाश-परिणाम नीट साधून दादासाहेब चित्रपटांतील देखावे मांडीत असत. 'लंकादहन' मधील मारुती आकाशांत भरपूर व उंच उंच उड्डाण करणार होता. तें आकाश त्या उड्डाणासाठीं याच वृक्षाखालीं येऊन हात जोडून उभें होतें— अर्थात् आकाशाप्रमाणें रंगविलेल्या पडद्याच्या रूपानें !

वृक्षाखालीं सुमारें आठ-दहा फूट उंचीची लोखंडी बैठक होती. त्या बैठकीवर मारुतीनें पोटाला तो आधार घेऊन पालथें पडायचें आणि हातपाय हलवायचे. मारुती इकडे

हातपाय हलवूं लागला कीं दादासाहेबांचा कॅमेरा सुरू झाला. मारुती आकाशांत 'उंच उंच आणि दूर दूर उड्डाण' करतांना त्याची फोटोफिल्म तयार होऊं लागली !

त्यांत मौज अशी कीं, मारुती जिच्यावर पालथा पडे ती लोखंडी बैठक कांहीं फोटोंत दिसायची नाहीं. तिचें छायाचित्र उमटूंच नये अशी तिची मांडणावळ, रचना, रंगसंगति, सारें कांहीं.

## मारुतीसाठीं बालनटच कां ? :

बरें, मारुतीसाठीं नटाची योजना करण्यांतहि दादासाहेबांनीं खरोखरच अजब कल्पकता लढविली होती. अगदीं आरंभींच्या काळांत नट-नाटच नट-नटींच्या अंगींहि सरावाच्या अभावीं बाणलें नव्हतें. अशा वेळीं मोठ्या वयाच्या माणसाला तसली नटवेगिरी करतांना कदाचित् संकोच वाटायचा. एखाद्या नटानें सरळ एखाद्या राजाचें, राजपुत्राचें ब्राह्मणाचें वा असेंच कोणा ना कोणा बऱ्यावाईट माणसाचें काम करणें निराळें, आणि मारुतीचें, वानराचें काम करणें निराळें. मारुती म्हणजे—ती त्याची शेपटी, त्या मिशा, सारीच 'हुप्प' गिरी. ती वठवितांना निर्भयपणा व निर्लाजाळूपणा असला, तर हा मारुती आहे असें वठणार आणि प्रेक्षकांना पटणार. नाहींपेक्षां साराच कारभार बेंगरूळ होण्याचें भय !

तसला लाजाळूपणा, भिडस्तपणा, निरागस लेकरांच्या ठायीं मुळींच नसतो. त्यांना उलट माकडतोंड, मिशा आणि शेपूट लावायला मौज वाटायची ! बालमानसशास्त्रांतील

ही एक गुरुकिल्ली दादासाहेबांनीं 'लंकादहन' चित्रपटाच्याच बाबतींत नव्हे, तर त्यांच्या बहुतेक साऱ्या चित्रपटांच्या बाबतींत अचूक हस्तगत केली होती. त्या गुरुकिल्लीच्या जोरावर त्यांनीं आपलें कलावैभव पाहणाराची दृष्ट लागेल इतक्या उत्कटतेनें रजतपटावर खुलवून दाखविलें.

त्या चित्रपटांत मारुतीला सर्कशींतल्याप्रमाणें अधांतरीं उड्डाण करावें लागलें. तें करतांना मारुतीला प्रथम कांहींसा संकोच व कांहींसें भय वाटलें. पण मग लगेच ती गंमत वाटली. तशीच गंमत त्या मुलांना त्याच चित्रपटांत राक्षसाचीं कामें करतांनाहि वाटायची.

**'कृष्णजन्म' :**

'लंकादहन' नंतर 'हिंदुस्थान' चा 'कृष्णजन्म' चित्रपट निघाला. त्यांत कंसाला जळीं, स्थळीं सर्वत्र कृष्णच दिसतो. तें काम दादासाहेबांनीं आपली तेव्हांची लहानगी परकरी कन्या कुमारी मंदाकिनी हिच्याकडून करून घेतलें. तें अत्यंत यशस्वी झालें, हें तो चित्रपट पाहिलेल्या तेव्हांच्या मंडळींच्या तोंडून आपल्याला आजहि ऐकूं येतें.

ही बालनटी मुद्रासौष्ठव व अभिनयकौशल्य ह्या देणग्या उपजत बरोबर घेऊन आलेली असते. परंतु हा झाला सोन्याचा गुण. पण नुसत्या सोन्याला काय सौंदर्य? त्या सोन्याचें नयनमनोहर घाटदार अलंकार घडविण्यास कुशल कारागीर भेटला, म्हणून त्यानें असे सुंदर अलंकार घडविले कीं नाहीं?

## ‘कालियामर्दन’ :

या दोन चित्रपटांनंतरचा फाळक्यांचा तिसरा लोकप्रिय चित्रपट ‘कालियामर्दन’. या चित्रपटांत लांबीरुंदी पेक्षां महत्त्वशील परिणामाच्या दृष्टिनेंहि प्रधान भूमिका बालकृष्णाची होती. ती भूमिकाहि त्यांच्या कसोटीला उतरलेल्या त्यांच्या लहानग्या मंदाकिनीच्या वांट्याला ओघानेंच आली.

श्रीकृष्ण हें दादासाहेबांचें परमदैवत. श्रीकृष्णाच्या बाललीलांचा आविष्कार करणारा चित्रपट तयार करण्यांत त्यांना आगळा हुरूप वाटणें अगदीं स्वाभाविक होतें. हें कृष्णप्रेमाचें व कृष्णभक्तीचें परममंगल साध्य आणि त्या साध्याला पोषक ठरणारी घरची, हक्काची, हाताशीं असलेली रूपकुशल अभिनयकुशल बालनटी. अशी दुधांत साखर पडल्यावर त्या चित्रपटाच्या ठायीं असाधारण दर्शनमाधुरी निर्माण झाली नाहीं तरच आश्चर्य !

‘कालियामर्दन’ चित्रपटाची कथा प्रामुख्यानें कृष्णचरित्रा-सभोंवारच गुंफलेली आहे. तीहि कृष्णाच्या बालचरित्रासभोंवार. झाडावरून उड्या मारणें, घरावर चढणें, कालियाच्या फ़णेवरून डोहांत उड्या मारणें अशीं अवघड कामें करतांना त्या मुलीला भय वाटायचें. पण तें भय दादासाहेबांच्या बिनधोक प्रोत्साहनानें पार कुठच्या कुठें बेपत्ता व्हायचें !

**चित्रपटाची पूर्वतयारी :**

दादासाहेबांच्या चित्रपटाच्या पूर्वतयारींत चित्रपटांत कामें करणाऱ्या मंडळींना तयार करून घेण्याला विशेष महत्त्व आहे. ही तयारी करून घेण्याची त्यांची धाटणी अशी कीं चित्रपट घेण्याला सुरुवात करीपावेतों मजल येऊन ठेपल्यावर पहिली गोष्ट, "या. सारी मंडळी या. येथें बसा."

मंडळी आली, बसली, कीं प्रथम बहुधा त्यांनीं संकल्पित चित्रपटाची गोष्ट सर्वांना सांगायची.

नंतर कोणत्याहि प्रसंगाचा देखावा घेण्यापूर्वीं तो प्रसंग नीटफोड करून निवेदन करायचा. त्यांची निवेदनाची पद्धतहि सजीव व परिणामकारक असे. त्यामुळें ती ती भूमिका करणाऱ्या नटनटींच्या अंगांत त्या भूमिकेचें वारें 'संचारूं' लागायचें. नट त्या भूमिकेशीं त्या प्रसंगापुरता मनानें अगदीं समरस होऊन जायचा. त्यामुळें चित्रण घेतांना प्रत्यक्ष हावभाव करतेवेळीं अडल्या-अडल्यासारखें अगर कुचंबल्यासारखें होण्याचें कारणच पडत नसे. त्यांच्या चित्रपटांत कामें करणारी मंडळी सारीच निष्णात व अभिनयकुशल होती असें नव्हे. परंतु त्यांची भूमिकेशीं समरसता कशी साधावी हें दादासाहेबांना चांगलें कळे. आणि ते तिकडे अगदीं कटाक्षानें लक्ष देत. त्यामुळें परकेपणा व नटवेपणा म्हणजे मूळ भूमिकेपेक्षां विसंगत असें निराळेंच कांहींतरी घडत नसे आणि प्रेक्षकांच्या नजरेलाहि पडत नसे.

### कृष्ण घर सोडून चालला :

हा योग दादासाहेबांना किती उत्कटतेनें साधे याचें नमुन्यादाखल 'कालियामर्दन' चित्रपटांतीलच एक उदाहरण देतां येईल. त्या कथेंत एक प्रसंग असा आहे कीं, कृष्ण गोपींवर व यशोदेवर रुसून घराबाहेर पडतो. तो रुसण्याच्या भरांत घराला अखेरचा नमस्कार करून जो निघतो तो सुसाट थेट यमुनातीरीं जातो. तिथें नदींत असतो कालियाचा डोह. त्या डोहांत त्याला कालिया आढळतो. तो त्याच्यावर फूत्कारत असतो. त्याला गिळूं पाहतो. असें तें भयंकर उपद्रवी जनावर म्हणून कृष्ण कालियाला ठार मारतो.

हा कृष्णाचा घर सोडून जाण्याचा प्रसंग. उद्यां हा देखावा घ्यायचा त्याच्या पूर्वदिवशीं रात्रीं जेवतांना पंक्तींतच दादासाहेब सर्वांना समजावून देत होते. कृष्ण म्हणजे मंदाकिनी त्यांच्या शेजारींच पानावर बसली होती. कृष्ण जेव्हां रुसव्याच्या आवेशांत घर सोडून निघाला, तेव्हां घराला अखेरचा नमस्कार करतांना त्याला कसें गहिंवरून येतें याचें दादासाहेबांनीं इतकें हृदयस्पर्शी व उदात्त वर्णन केलें कीं, तें ऐकतां ऐकतां सहा वर्षांच्या त्या कोंवळ्या मुलीच्या तोंडांतला घांस तोंडांतच अडखळला आणि हात ताटावर तटून बसला. तिला अगदीं भडभडून आलें. गहिंवर आवरेना. त्या आवेगासरशीं ती ओक्साबोक्शीं रडूं लागली. त्यासरसें पंक्तींतील सर्वांचें लक्ष तिच्याकडे वेधलें गेलें.

**"कृष्ण" रडतो कां ? :**

"अरे काय, झालं काय हिला रडायला ?" जो तो विचारूं लागला. आणि सारे आपापल्या परीनें मुलीच्या रडण्याचा अन्वयार्थ लावूं लागले.

कोणी म्हणावें, "अग, भाजी तिखट लागली का ?" तर कुणी असेंच आणखी कांहीं सांगावें.

कुणी चिमुटभर साखर आणून बेबीच्या तोंडांत घातली आणि तिला उगी करण्याचा प्रयत्न केला.

तरीहि हिचें तोंड कांहीं केल्या थांबेना. तेव्हां वडील माणसांनीं कल्पना चालविली, "अरे रात्र झाली, हिला झोंप आली असेल. झोपवा तिला नेऊन."

अखेर मंदाकिनीला तिची तिलाच जाणीव झाली कीं, आतां ही मंडळी आपणाला हंसतील, चेष्टा करतील आणि उगीचच फजिती होईल. म्हणून मग संकोचून ती आपसुकच हुंदके गिळून गप्प झाली.

पण तो प्रसंग तसा निभला तरी त्या प्रसंगाचा अवश्य तो ठसा मात्र मुलीच्या मनावर वज्रलेप होऊन राहिला. त्याचा सुपरिणाम दुसऱ्या दिवशीं दादासाहेब तो देखावा 'बकाणा' स्टुडिओंत चित्रित करूं लागले तेव्हां आपो-आपच ठळकपणें दिसून आला. चित्रपटांत कृष्णाचा त्या दिवशींच्या त्या महत्त्वाच्या प्रसंगींचा अभिनय सर्वोत्कृष्ट व अगदीं हृदयस्पर्शी झाला.

भारतीय चित्रपटांत मुलीनें काम केल्याचें हें पहिलें उदाहरण. दादासाहेबांची कन्या मंदाकिनी ही भारताची पहिली कुमारी नटी होय.

**फाळक्यांच्या यशाचें इंगित :**

अगदीं पहिल्या प्रतीचे व जातिवंत नट जे असतात ते कोणताहि अभिनय सहजगत्या अगदीं अप्रतिम वठवितात. उदाहरणार्थ महाराष्ट्राचे अग्रगण्य नट कै. गणपतराव जोशी यांची 'तुकाराम' नाटकांतील भूमिका इतकी परिणामकारक व तद्रूप होत असे कीं, हा साक्षात् तुकारामच आपणांपुढें अवतरून बोलत आहे असें श्रोत्यांना वाटावें. तें नाटक पाहून अनेक भाविक श्रोत्यांना तसें वाटेही.

परंतु अशी अभिनयाची उपजत देणगी ज्यांच्या वांटचाला आलेली नाहीं अशा इतर नटांच्या मनावरहि ज़र एखादी भूमिका योग्य प्रकारें बिंबविली गेली, तर ते तिच्याशीं तद्रूप होऊन जी भूमिका रंगभूमीवर वठवितात, तिच्यांत प्रेक्षकांचीं मनें आकर्षित करून घेणारा जिव्हाळा व जिवंतपणा स्वाभाविकपणेंच उत्पन्न होतो. दादासाहेब फाळक्यांना त्यांच्या चित्रपटांसाठीं सर्वच नटनटी पहिल्या प्रतीच्या न लाभतांहि त्यांच्या चित्रपटांत जो परिणामकारक जिवंतपणा ओसंडत असे, त्याचें कारण त्यांची नटांना भूमिका उत्तम प्रकारें समजावून देऊन त्यांना त्या भूमिकांशीं समरस करून सोडण्याची हातोटी होय.

शैक्षणिक चित्रपटांच्या बाबतींत याच दादासाहेबांची मूलग्राही तळमळ, तिची परिणामकारकता आणि त्या

बाबतींत केवळ जाणवण्याइतकाच नव्हे तर हंसत खेळत सहन न करतां येण्याजोगा अपेक्षाभंग दादासाहेबांच्या वांटचाला आला असावा.

**वैभवशाली अगतिकता :**

दादासाहेबांचा चित्रपट व्यवसायांतील एक विशेष—तो परिस्थितिप्राप्त म्हणून असो अथवा त्यांचा स्वतःचा आवडता म्हणून असो—हा कीं, पटकथालेखनापासून दिग्दर्शनापावेतों प्रत्येक क्षेत्रांत सगळें तांत्रिक काम करणारे त्यांचे तेच. ही गोष्ट आजच्या जमान्यांत नवी वाटेल. आज कदाचित् कोणाचा त्यावर विश्वास बसणेंहि अवघड होईल. उद्योगधंद्यांच्या वाढीबरोबर कामाच्या वांटणीची व श्रम-विभागाची आजकालची बसलेली घडी वाईट नव्हे. या कलेच्या प्रत्येक आंगोपांगांतील निष्णात मंडळीचें नैपुण्य असें वेंचून पारखून कामीं आणणें हें केव्हांहि इष्टच. पण दादासाहेबांनीं या सार्‍या गोष्टी ज्या एकाकीपणाने चांगल्या प्रकारें पार पाडल्या त्याला त्यांच्या ठिकाणची तळमळ आणि आत्मविश्वास तर कारण होताच, परंतु त्यापेक्षां त्यांची एक प्रकारची वैभवशाली अगतिकताहि कारण होती.

ती अगतिकता वैभवशाली अशी. जिथें या व्यवसायांतील श्रीगणेशायनमः स्वतः म्हणतां म्हणतां इतर इच्छुकांना तसें म्हणायला लावून शिकणें आणि शिकविणें या दोन्ही

भूमिका त्यांना एकटयालाच पार पाडणें प्राप्त व इष्ट होतें, तिथें त्यांनीं कथालेखक काय, दिग्दर्शक काय, फोटोग्राफर काय, जाणते लोक काय आयते तेव्हां आणावे कोठून ?

"कां ? पगार मोजल्यावर असे हवे तसे लोक नोकरीला ठेवतां येत नाहींत ?" असा प्रश्न यावर कोणीहि चटकन विचारूं शकेल.

चांगला पगार मोजून तज्ज्ञ लोक नोकरीवर ठेवण्याचा प्रश्न द्रव्यसाहाय्यावर अवलंबून होता हें तर खरेंच. इतका अमूप पैसा दादासाहेबांच्या हातीं नसेलहि. आणि ते ज्या एका सर्वतोपरी महान कलेची उपासना करून आपल्या राष्ट्रासाठीं त्या कलेचा विकास व जोपासना करीत होते, तिची महति तत्परतेनें ओळखून तसा त्यांचा पाठराखेपणा करायला सुजाण लक्ष्मीपुत्र मोकळ्या व थोर मनानें पुढें आले नसतीलहि.

असें भांडवल आपखुषीनें बोलतें होऊन दादासाहेबांच्या हांकेला उभें राहिलें असतें तर दादासाहेबांनीं दुराग्रहानें तें दूरच लोटलें असतें असें नव्हे. परंतु अशी प्रसन्न लक्ष्मी त्यांच्या मस्तकावर वरदहस्त ठेऊन त्यांचें प्रिय करण्यास स्वतः होऊन पुढें आली नसती. आणि चंचल लक्ष्मीची मनधरणी करीत बसण्याची लाचारी त्यांना स्वतःलाहि पत्करावीशी वाटली नसेल.

**महान उद्देश :**

शिवाय दादासाहेबांचा आणखी एक महान उद्देश या सगळ्याच्या मुळाशीं होताच कीं ! ज्या कारणासाठीं त्यांनीं परदेशांत पायांपाशीं चालून आलेली विलोभनीय संधि दूर सारली, त्याच कारणासाठीं त्यांनीं या कलेच्या क्षेत्रांतील प्रत्येक बाबतींत स्वतःच्या पायांवर उभें राहण्याची, दुसऱ्या कोणाच्या कटिखांद्यावर न बसतां स्वतःच्या पायांनीं व स्वतःच्या पायांनी नजरेनें मार्ग न्याहाळीत प्रगतीचा मार्ग चोखाळण्याची हिंमत बाळगून ती तितक्याच निष्ठेनें आणि हिरीरीनें पार पाडली.

त्यामुळें त्यांच्या पश्चात पुढील मंडळींना या कलेच्या क्षेत्रांत पुढें पाऊल टाकायला हुरूप आला. मुळांत सुजाण हिंमतीखेरीज कशांत कांहीं उपलब्ध नसतांना दादासाहेबांसारख्या एकाकी माणसानें जर ही एवढी भारतीय सिनेमासृष्टी निर्माण केली, तर त्यांच्या परिश्रमांचें आणि पुण्याईचें एवढें मूर्तिमंत पाठबळ आयतें पाठीशीं असतांना आपणांला या चित्रपट व्यवसायाच्या नव्या सृष्टींत आगे कूच कां करतां येणार नाहीं ?—असें त्या कलेकडे कोणत्याहि प्रकारच्या यशाच्या तीव्र अपेक्षेमुळें कां होईना पण पोटतिडिकेनें पाहणारा प्रत्येक महाराष्ट्रीय आणि महाराष्ट्रीयेतरहि हिंमतबहाद्दर आत्मविश्वास बाळगीत पुढें पावलें टाकूं लागला.

'हिंदुस्थान' चित्रपट कंपनीचा म्हणजेच दादासाहेबांचा 'राजा हरिश्चंद्र' हा पहिला चित्रपट सन १९१२ सालीं प्रसिद्ध झाला. तेव्हांपासून सन १९३७ सालापावेतों त्यांचे लहान मोठे १२५ चित्रपट प्रकाशांत आले. 'गंगावतरण' हा त्यांचा अखेरचा चित्रपट होय. याची निर्मिति कोल्हापूरला झाली. कारण तेव्हां नासिकचें एकमेव चित्रपटवैभव ओसरलें होतें. हे सारे चित्रपट कोंडयाचा मांडा होत होत साकार झाले, हें आपण पाहिलेंच. परंतु त्या चित्रपटांच्या पदरीं पडलेलें यश मात्र कुबेरानेंहि हेवा करण्याजोगें होतें. सन १९२८ सालीं इंडियन सिनिमेटोग्राफ कमेटीपुढें साक्ष देतांना एका चित्रपटगृहाच्या मालकानें 'हिंदुस्थान' चित्रपटांविषयीं काढलेले उद्गार याला साक्ष म्हणून पुरेसे आहेत.

"रोजचा खेळांचा गल्ला भरून नेण्यासाठीं बैलगाडी आणवावी लागे," असे ते उद्गार होते.

**विपुल कार्य :**

दादासाहेबांचा बहुतेक सारा भर पौराणिक चित्रपटांवर असे. त्यांतले 'राजा हरिश्चंद्र,' 'सत्यवान-सावित्री' 'नल-दमयंती,' 'लंकादहन,' 'कृष्णजन्म,' 'कालियामर्दन,' 'गंगावतरण' हे त्यांचे सोन्यावरील जडावाच्या कामासारखे लोकप्रिय झालेले चित्रपट होत. त्यांखेरीज 'पिठाचे पंजे,' 'जांवईबुवांची फजिती' असे कांहीं हास्यचित्रपट त्यांनीं तयार केले. तसेंच 'तळेगांवचा कांच-

कारखाना,' 'वेरुळचीं लेणीं,' 'लक्ष्मीचा गालिचा' वगैरे कांहीं वार्तापट आणि प्रवासवर्णनपर चित्रपटहि तयार केले.

हे सर्वच्या सर्व चित्रपट दादासाहेबांच्या खास स्वतःच्या प्रयोगसिद्ध आणि अनुभवसिद्ध अशा 'फाळके' तंत्रांतून उत्स्फूर्त झाले होते. त्याला दुसऱ्या कोणाच्याहि बुद्धिमत्तेचा स्पर्श सुद्धां झालेला नव्हता. त्यांची स्वतःची स्वयंभू व विचारसातत्य, श्रमसातत्य आणि अभ्यास यांनीं परिणत झालेली कलागर्भ प्रज्ञा हीच त्यांच्या चित्रपट-कला-तपस्येच्या यशस्वितेची जननी होय.

त्या त्यांच्या यशस्वितेचा गौरवशाली विशेष हा कीं आज चाळीस वर्षांचा दीर्घ काळ लोटल्यावर आणि चित्रपटकला तंत्रदृष्टचा आणि कलादृष्टचाहि अतिशय परिपूर्ण अवस्थेला पोहोंचल्यावर देखील दादासाहेबांचें त्यांच्या चित्रपटांतील प्रकाशलेखन आणि हातचलाखीचे, नजरचलाखीचे देखावे (ट्रिक सीन) यांची महति सदा-फुलीसारखी सदा टवटवीत दिसते.

**तेव्हां आणि आतां :**

आजच्या भारतीय चित्रपट व्यवसायांत दादासाहेबांच्या काळाच्यापेक्षां पुष्कळच सर्वांगीण प्रगति झाली आहे. इतकी कीं, तिथें या दोहोंची तुलना करणेंहि बहुशः योग्य होणार नाहीं. तथापि तुलना करूं नये म्हटलें तरी एका गोष्टींत ती तुलना आपोआपच होते; ती व्यावसायिक

शिस्त, संयम व शुचिता या अथवा मोजक्या एका शब्दांत सांगायचें झालें तर मानवृताशील सुजाणपणाच्या बाबतींत.

**‘हिंदुस्थान’ कुटुंब :**

फाळके यांच्या ‘हिंदुस्थान’ चित्रपट संस्थेचा कुणालाहि अभिमान बाळगण्याजोगा विशेष हा कीं ती संस्था म्हणजे एक मोठें कुटुंब होतें. संस्थेंतील सर्व मंडळींचें वास्तव्य एकत्र असे. त्यांचें चहापाणी, जेवणखाण सारें एका कुटुंबांतल्यासारखें. एवढ्या मोठ्या कुटुंबाची आस्थापूर्वक सर्वतोपरी व्यवस्था ठेवणारी घरधनीण माउली काकी. काकी ह्या जशा स्वतःच्या लेंकरांच्या आई, तशाच संस्थेंतील सर्व मंडळींच्याहि आई. तें ‘कुटुंब’ पाहून आपण वेदकालाच्या प्रथम चरणांतील मातृप्रधान सामुदायिक सुखी कुटुंबच पहात आहों कीं काय असा भास पहाणाराली व्हावा.

**कर्डी शिस्त :**

असें जरी होतें, तरी या कुटुंबांत पाळली जाणारी शिस्त मात्र शंभरनंबरी सुवर्णासारखी चोख असे. त्याचे खुद्द दादासाहेबांच्या कन्येचें एकच उदाहरण खुद्द त्यांच्याच शब्दांत दिलें तरी पुरेंसें होईल. त्या सांगतात, “कालियामर्दन’ च्या आउट डोअर शूटिंगसाठीं आम्ही सायखेडें या गांवीं गेलों होतों. तेथें चार-आठ दिवस मुक्काम होता. मी एकटी होत्यें. भावंडें कोणीच बरोबर नव्हतीं. माझा

वेळ जात नसे. मी ती. दादांच्या दाढीचा आरसा घेतला व त्यांनींच मला शिकविलेले आश्चर्य, राग, भीति वगैरे मुद्राभिनय करीत आरशांत पहात बसल्यें. माझे इतके लाड व कौतुक करणारे ती. दादा खोलींत आले व मला आरशांत तोंडें करीत बसलेली पाहून त्यांनीं एकदम सणसणीत थोबाडींत लगावली. माझें काय चुकलें तें मला कळेना. ते गरजले, "कारटे ! आरशांत कसलीं तोंडें करतेस ? फक्त मेकपच्या वेळीं आरसा पहावा. परत आरसा तुझ्यासमोर दिसला तर फोडून काढीन तुला."...हा प्रसंग माझ्या मनांत इतका ठसला कीं प्रौढपणीं सुद्धां फणेऱ्याची पेटी उघडून मी कधीं त्यांच्यासमोर बसल्यें नाहीं."

**एक सदिच्छा :**

आणि शेवटीं त्यांच्या त्या सुकन्येच्या शब्दांतच या परिचयाचा समारोप करायचा तर...सिनेमासृष्टींत वातावरण उच्च दर्जाचें रहाणें यासाठीं त्यांची फार धडपड असे. त्या दृष्टीनेंच त्यांनीं या कलेचें संगोपन चालविलें होतें. बाल्यावस्थेंतली, पाळण्यांतली चित्रपट-सृष्टि ही अशी ती. दादांच्या व ती. काकींच्या आंगाखांद्यावर खेळून लहानाची मोठी झाली. पण ऐन वयांत आल्यावर मात्र धनिकांच्या व भपकेबाजपणाच्या आयुष्यावर भाळून ती आपल्या जन्मदात्याच्या अपेक्षा पुऱ्या करूं शकली नाहीं. आतां जरी त्यांनीं अपेक्षिलेलें व देशहितपरिपोषक

वळण तिनें घेतलें, तरी तिच्या स्वर्गस्थ मातापित्यांना धन्यता वाटेल.

**अखेर :**

असा हा भारतीय चित्रपट-व्यवसायांतील महान आद्य महर्षि नासिक येथें अतिशय हलाखीच्या आर्थिक दशेंत शांतपणें २४ फेब्रुवारी १९४४ या दिवशीं अंतर्धान पावला. त्याची आठवण नाहीं म्हणायला मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशननें ठेवली. त्यांचें आरंभीचें कलाक्षेत्र ज्या स्थानीं होतें त्या परिसरांतील रस्त्याला 'दादासाहेब फाळके' रस्ता असें नांव मात्र दिलेलें आढळतें. त्याखेरीज त्यांची आठवण करून देणारा 'नाहीं चिरा नाहीं पणती' अशी स्थिति आहे.

पण आजचा वैभवशाली भारतीय चित्रपट-व्यवसाय हें मात्र त्यांचें विराट, दिगंतकीर्ति, अखिल भारतीय स्मारक मूर्तिमंत असतांना त्यांच्या आणखी याहून थोर अशा कोणत्या स्मृतिचिन्हाची अपेक्षा आपण करावी ?

१२७६ दि० २०।५।७९
बा.वा.

वोरा कंपनीची

**कुमार साहित्य माला**

ही शालेय ग्रंथालयांचें भूषण

ठरली त्याला कारणहि तसेंच आहे :

• • •

माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें
अत्यंत काळजीपूर्वक केलेली पुस्तकांची निवड.
काटेकोरपणानें केलेलें संपादन.
टाईप, चित्रें, मथळे आणि शुद्धलेखन
याबाबत घेतली जाणारी दक्षता.
अशा अनेक गोष्टींचा उल्लेख
याबाबतींत करतां येण्यासारखा आहे.
शाळा-चालकांच्या नि शिक्षणतज्ज्ञांच्या
कसोटीला उतरल्यावरच ती आपलें
स्थान निश्चित करूं शकली आहे.
कथा, कादंबऱ्या, प्रवासवर्णनें, साहसें,
इ. अनेकप्रकारचीं ७५ पुस्तकें.
संपूर्ण यादी मागवून घ्या.

• • •

**वोरा अँण्ड कंपनी**
**पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड**
३, राउंड बिल्डिंग, काळबादेवी,
मुंबई २

BVBK-0401246

# कांहीं तरी नवेंच करा

जीवनाची ठराविक चाकोरी सोडून–'कांहीं तरी नवेंच' करण्याची ईर्षा बाळगली आणि तत्सिद्ध्यर्थ विशिष्ट जीवनक्षेत्रांत अलौकिक कर्तृत्व केलें अशांची चरित्रें.

तीस मिनिटांत वाचून होणारीं [illegible] : शालेय-वर्गग्रंथालयासाठीं योजना

१. असा असतो देशभक्त : कोतवाल
२. गुलाम बंड करतो : स्पार्टकस
३. रा. शिक्षणाचा ध्यास : विजापूरकर
४. कादंबरीकार हरीभाऊ : आपटे
५. मराठी नटसम्राट : गण. जोशी
६. व्यायाम भीष्माचार्य : माणिकराव
७. लष्करी संघटक : क. लॉरेन्स
८. अलौकिक शिल्पकार : एंजलो
९. चित्रपट महर्षि : दादासाहेब फाळके
१०. इतिहासाचार्य राजवाडे : राजवाडे
११. बंदीजनांची माउली : फ्राय
१२. देशासाठीं दर्यापार : जेम्स कुक
१३. वीरबाला झोया : ( रशिया )
१४. बहादूर शिकारी : जिम कॉर्बेट
१५. कोई बी चीज उठाव : वुलवर्थ
१६. वीरपत्नी राणी दुर्गावती :
१७. विख्यात वकील : बॅ. जयकर
१८. बिलक्षण वार्ताहर : अर्नेस्ट पाइल
१९. भारतीय चित्रकार : रविवर्मा
२०. मराठी मुद्रण-प्राणदाता : जावजी
२१. राजमाता जीजाबाई
२२. स्वदेशी कारखानदार : अंताजी काळे
२३. भव्य स्थापत्य : फर्डिनांड द लेसेप्स
२४. सर्कसबहाद्दर : विष्णुपंत छत्रे
२५. भक्तिवेडी बहिणा : बहिणाबाई
२६. सद्‌गुणी बनण्याची कला : फ्रॅंकलिन
२७. भारत-कवि टागोर : रवींद्रनाथ
२८. कोशकार केतकर : डॉ. केतकर
२९. कृषिपंडित : दादासाहेब शेंबेकर
३०. खरा खेळाडू : पी. बाळू
३१. चिरंजीव मरण : मदनलाल धिंग्रा
३२. विमामहर्षि : अण्णासाहेब चिरमुले
३३. तेजस्वी धर्मोद्धारक : शंकराचार्य
३४. बंडखोर लोककवि : अनंत फंदी
३५. साकार संगीत : पं. पलुस्करबुवा
३६. साहसी वैमानिक : सॅंटा ड्युमॉं
३७. दरियाचा राजा : कान्होजी आंग्रे
३८. जमिनीचा जादूगार : डॉ. कार्व्हर
३९. लाखांचा प्राणदाता : लुई पाश्चर
४० शिक्षण-भगीरथ : भाऊराव पाटील
४१. मराठी-मुद्रक : गणपत कृष्णाजी
४२. बर्फांतला माणूस : हिलरी
४३. प्राणावरचा प्रवास : शिफले
४४. दानशूर कुबेर : रॉकफेलर
४५. प्रवासी पंडित : ह्युएनत्संग
४६. नृपनिर्माता : आर्य चाणक्य
४७. असामान्य क्रिकेटपटु : ब्रॅडमन
४८. लोकहिताचा संरक्षक : वि. पटेल
४९. पहिला मिशनरी : गजाननराव वैद्य
५०. तुम्हांला कोण व्हावेंसें वाटतें ?

प्रत्येक पुस्तक पन्नास नये पैसे : संच पेटी रु. २५.

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.